International Year of Cooperatives

महाराष्ट्र शासन

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/निमं-MIS/मार्गदर्शक सुचना/३०८४/२०२५ दिनांक :- ११ डिसेंबर, २०२५

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

३) उपनिबंधक / सहाय्यक, सहकारी संस्था (सर्व)

**विषय :- महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे Management Information System या ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत सुचना.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र दि.०७/११/२०२५, १९/११/२०२५ व २८/११/२०२५

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रांकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांनी राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे कामकाजाची माहिती एकत्रित करण्यासाठी 'मे.कल्प टेक्नॉलॉजीस् प्रा.लि., पुणे' या कंपनीमार्फत 'Management Information System' ही ऑनलाईन प्रणाली (https://patsansthaniyamakmandal.in) विकसित केली आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्रांद्वारे सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत आवश्यक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच आपले कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांनी माहिती भरल्यानंतर सदरच्या माहितीची आपलेस्तरावर खात्री करण्यासाठी आपले कार्यालयास युझर आयडी व पासवर्ड देण्यात आले आहेत.

सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये दि.१५/१२/२०२५ पर्यंत माहिती भरणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. तथापि राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांना सदर प्रणालीमध्ये माहिती भरताना विविध अडचणी / समस्या आल्यामुळे, सदर कालावधी वाढविण्याबाबत पतसंस्थांनी विनंती केली आहे. त्यानुसार **सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याचा कालावधी दि.३१/१२/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देणेत येत आहेत.

i) तालुका / वॉर्ड उपनिबंधक / सहाय्यक निबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात मुख्यालय असलेल्या सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांची (अवसायनातील पतसंस्था वगळून) माहिती दि.३१/१२/२०२५ पर्यंत भरण्याबाबत दक्षता घ्यावी. पतसंस्थांनी भरलेली माहिती तपासून घ्यावी. माहिती

चुकीची / अपूर्ण भरली असल्यास, या कार्यालयाचे दि.१९/११/२०२५ रोजीचे पत्रामध्ये नमूद पध्दतीप्रमाणे माहिती दुरुस्त करुन घ्यावी.

ii) काही पतसंस्थांनी त्यांचे प्रोफाईल तयार केले आहे, तथापि माहिती भरलेली नाही अशा पतसंस्थांची माहिती भरुन घ्यावी.

iii) ज्या पतसंस्थांनी एकापेक्षा जास्त वेळा लॉगीन तयार केलेले आहेत, त्याची खात्री करुन एकाच लॉगीनमध्ये माहिती भरुन घ्यावी व डिलिट करावयाच्या लॉगीनची माहिती या कार्यालयास सादर करावी.

iv) जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांचे जिल्हयामधील सर्व कार्यरत पतसंस्थांची माहिती ऑनलाईन पोर्टलमध्ये भरण्यात आली आहे याबाबत प्रमाणित करुन त्याबाबतचा अहवाल दि.०१/०१/२०२६ रोजी या कार्यालयास सादर करावा.

v) ज्या कार्यरत पतसंस्थांची माहिती सदर प्रणालीमध्ये भरली जाणार नाही, त्यांचा शोध घेऊन त्यांचेवर कायदा व नियमामधील तरतूदीनुसार आवश्यक ती कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी.

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे